




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २७८ ●गुरूवार, दि.०८ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# आरक्षण मिळाल्यानंतर पुन्हा जनरल कॅटेगरीवर दावा करता येणार नाही

**● सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय**

**नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयाने अलीकडे दिलेल्या दोन महत्त्वाच्या निर्णयांत 'जनरल (अनारक्षित) कॅटेगरी' या संकल्पनेचा अर्थ आणि मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. या निकालांमधून एक मूलभूत तत्त्व ठळकपणे समोर आले आहे. आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने कोणतीही सवलत न घेता गुणवत्तेच्या जोरावर यश मिळवले असल्यास, तो जनरल कॅटेगरीत समाविष्ट होऊ शकतो; मात्र निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर सवलत घेतली असल्यास, जनरल जागेवर दावा करता येणार नाही.

एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, १९ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने राजस्थान उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवत स्पष्ट केले की, आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने कोणतीही विशेष सवलत किंवा शिथिलता न घेता जनरल कट- ट-ऑफपेक्षा जास्त गुण मिळवले असल्यास, त्याचा समावेश जनरल यादीत करणे बंधनकारक आहे. मात्र, ६ जानेवारी रोजी कर्नाटकातील एका प्रकरणात न्यायालयाने याच्या उलट भूमिका घेत, प्रीलिम्स परीक्षेत आरक्षणाचा लाभ घेतलेल्या अनुसूचित जातीतील उमेदवाराला भारतीय वन सेवाच्या अनारक्षित कॅडरमध्ये नियुक्ती देण्यास नकार दिला.

या दोन्ही निकालांमधून 'जनरल कॅटेगरी' संदर्भातील कायदेशीर भूमिका अधिक ठोस झाली आहे, असे मत या प्रकरणात बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कार्तिक सेठ यांनी व्यक्त केले. त्यांच्या मते, हा निर्णय कोणताही नवा कायदा मांडत नाही. तो फक्त आधीच निश्चित झालेल्या तत्त्वाची पुनः पुष्टी करतो. विशेषतः इंदिरा सहनी प्रकरण निकालात ठरवलेल्या समानतेच्या तत्त्वानुसार, गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या आरक्षि प्रवर्गातील उमेदवारांना जनरल जागांवर स्थान देता येते, परंतु फक्त तेव्हाच, जेव्हा त्यांनी कोणतीही सवलत घेतलेली नसते.

राजस्थान उच्च न्यायालयाने २०२३ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार, जनरल कट-ऑफपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या आरक्षित ▶ उर्वरित पान २ वर

**● राजस्थान प्रकरण : 'जनरल म्हणजे सर्वांसाठी खुली**

**राजस्थान प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, जनरल / ओपन कॅटेगरी ही कोणत्याही जात, वर्ग किंवा लिंगापुरती मर्यादित नसून सर्वांसाठी खुली आहे. अर्जात आरक्षित प्रवर्ग नमूद केल्याने उमेदवार आपोआप आरक्षित जागेसाठीच पात्र ठरतो. न्यायालयाने यावेळी सौरव यादव प्रकरणाचा हवाला देत नमूद केले की, ओपन कॅटेगरी ही सर्वांसाठी खुली आहे आणि त्यात समावेश होण्याची एकमेव अट म्हणजे गुणवत्ता.**

# वैभव सूर्यवंशीचं तोडफोड शतक, पण...

## भाव खाऊन गेला टीम इंडियाचा दुसरा ओपनर

**● वडिलांचं तुटलेलं स्वप्न पूर्ण केलं!**

**मुंबई । प्रतिनिधी**



मुंबई : दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंडर-१९ यूथ वनडेमध्ये वैभव सूर्यवंशी आणि एरॉन जॉर्ज यांनी वादळी शतकं केली आहेत. वैभव सूर्यवंशीने ७४ बॉलमध्ये १२७ रन तर एरॉन जॉर्जने १०६ बॉलमध्ये ११८ रनची खेळी केली. जॉर्जने त्याच्या इनिंगमध्ये १६ फोर मारल्या. या दोघांच्या शतकांमुळे भारताने पहिले बेटिंग करताना ५० ओव्हरमध्ये ३९३/७ पर्यंत मजल मारली. १९ वर्षीय जॉर्ज वैभव सूर्यवंशीप्रमाणेच भारताचा विश्वासू ओपनर म्हणून तयार होत आहे. एरॉन जॉर्ज हा फक्त त्याच्या आक्रमक शॉट्सवर अवलंबून नाही, तर उत्कृष्ट फूटवर्क आणि उंच बॅकलिफ्टच्या जोरावर तो मैदानाच्या चारही बाजूंना शॉट्स मारू शकतो. एरॉन जॉर्जची तुलना संजू सॅमसनसोबतही केली जाते.

जॉर्जने वैभव सूर्यवंशीसोबत २२७ रनची ओपनिंग पार्टनरशीप केली. जॉर्जने या सीरिजच्या ३ सामन्यांमध्ये १४३ रन केले. जॉर्जला दक्षिण आफ्रिकेचा बॉलर जेसन राऊल्सने आऊट केलं. डॅनियल बॉसमेनने जॉर्जचा कॅच पकडला. ▶ उर्वरित पान २ वर

# रेल्वेमार्गे अन्नधान्य वाहतूक अधिक कार्यक्षम करावी

## खा.बजरंग सोनवणेंनी चेन्नईतील बैठकीत मांडले महत्वपुर्ण मुद्दे

**केज । प्रतिनिधी**

केंद्रसरकारच्या ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण विषयक संसदीय स्थायी समिती (२०२५-२६) अंतर्गत अन्नधान्य वाहतूक : रेल्वेमार्गाद्वारे हालचाल अधिक कार्यक्षम करण्याबाबत' आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस खा.बजरंग सोनवणे यांनी चेन्नई येथे उपस्थिती लावली. बैठकीत रेल्वेमार्गे अन्नधान्य वाहतूक अधिक कार्यक्षम करावी, असे महत्वाचे विविध मुद्दे मांडले. या बैठकीत भारतीय अन्न महामंडळ (एफसीआय), रेल्वे विभाग तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सखोल व सविस्तर चर्चा झाली. देशभरात अन्नधान्याची वेळेत व ▶ उर्वरित पान २ वर



### नराधमाच्या क्रौर्याने बीड जिल्हा पुन्हा सुन्न!

# ट्युशनला जाणाऱ्या अल्पवयीन मुलीचं अपहरण करून लैंगिक अत्याचार

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याला हादरवून सोडणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. ट्युशनला जात असलेल्या एका अल्पवयीन मुलीचे भरदिवसा कारमधून अपहरण करून तिला निर्जन डोंगराळ भागात नेण्यात आले आणि तिथे तिच्यावर पाशवी अत्याचार करण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झालं आहे.बीडच्या केज तालुक्यातील एका गावात राहत असलेली अल्पवयीन मुलीची आरोपी धीरज सांजुरे याच्याशी ओळख झाली. त्या ओळखीचा गैरफायदा घेत धीरज सांजुरे याने ६ जानेवारी रोजी पीडितेला फिरायला जाण्याचे आमिष दाखवलं. त्यानंतर पीडिता ७ जानेवारीला सकाळी ट्युशनला जाण्यासाठी सकाळी साडे नऊ वाजता निघाली होती. धीरज सांजुरे त्या अल्पवयीन मुलीला रस्त्यात थांबवलं. तिला कारमध्ये बसवलं आणि धारूर तालुक्यातील अंबाचोंडी येथील डोंगरात नेलं. डोंगरात एका निर्जनस्थळी कोणी नसल्याचा गैरफायदा घेत त्याने अल्पवयीन मुलीच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडित मुलीनं ही माहिती तिच्या पालकांना दिली. पालकांनी पीडित मुलीसह केज पोलिस स्टेशन गाठून या घटनेची माहिती पोलिस अधिकाऱ्यांना दिली. दरम्यान या प्रकरणी केज पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# संजय राऊतांचा मोठा गौप्यस्फोट! तीन नेत्यांची नाव घेत केला 'हा' मोठा दावा म्हणाले....



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड येथे भाजपवर सडकून टीका केली होती. भाजपची राक्षसी भूक मला पाहवत नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला होता. त्यांनी केलेल्या आरोपांनंतर राजकारण चांगले तापले होते. त्यानंतर अजित पवार आणि भाजपच्या नेत्यांमध्ये वार पलवावर सुरू झाले असून राजकीय संघर्ष निर्माण झाला आहे. या सगळ्या घडामोडींवर उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी गोप्यस्फोट करत मोठा दावा केला आहे.

अजित पवारांना ब्लेकमेलिंक करत असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. तसेच अजित पवार यांना ब्लॅकमेल करून तुम्ही (भाजप) राष्ट्रवादी फोडली, असा गौप्यस्फोट संजय राऊत यांना केला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. तुमचा धंदा ब्लॅकमेलिंगचा आहे. तुम्ही ग्रेट गॅमलर आणि ग्रेट ब्लॅकमेलर आहात, अशी घणाघाती टीका देखील संजय राऊत यांनी भाजपवर केली आहे.

सगळ्याच्या बाबातीत ब्लॅकमेलिंगचे राजकारण सुरूच आहे. ही फाईल उघडी आहे ती फाईल उघडी आहे. अजित पवार यांना ब्लॅकमेल करून तुम्ही राष्ट्रवादी ▶ उर्वरित पान २ वर

**● संजय राऊतांचा मोठा दावा**

**पुढे बोलताना संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर देखील टीकीचे बाण सोडले. एकनाथ शिंदे असतील किंवा अजित पवार असतील यांचा संबंध फक्त पैसा सत्ता आणि गुंडगिरीशी आहे. जोपर्यंत सत्ता तुमच्याकडे आहे, तोपर्यंत ते तुमच्याबरोबर राहतील, उद्या आमची सत्ता आली तर आमच्या दारात येऊन उभे राहतील, असा मोठा दावा देखील संजय राऊतांनी बोलताना केला आहे.**

### ज्याची भीती मैत्रिणींना होती तेच झालं! नवोदय विद्यार्थिनी मृत्यू प्रकरणात ट्विस्ट, वॉर्डन एक संशय आला अन्...



**लातूर । प्रतिनिधी**

इथल्या जवाहर नवोदय विद्यालयात सहावीत शिकणारी अनुष्का पाटोळे विद्यार्थिनी मृतावस्थेत सापडल्याने खळबळ उडाली होती. हॉस्टेलमध्ये विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली होती.

दुर्दैवाने, रविवारी तिचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत सापडल्याने एकच खळबळ उडाली. या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाल्याचं पहायला मिळालं. तसेच या प्रकरणात मुळाशी गेले असता वॉर्डनचं कनेक्शन समोर आलं आहे. लातूरच्या नवोदय आत्महत्या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली की, शाळेतील बाथरूमच्या भिंतींवर हृदयाचे चिन्ह काढून त्यात मुला-मुलींची नावे लिहिल्याचा संशय या मुलीवर घेण्यात आला होता. याच संशयावरून शाळेतील आया लता गायकवाड आणि वॉर्डन पल्लवी कणसे यांनी अनुष्काला सर्वांसमोर बेदम मारहाण केली. शारीरिक छळासोबतच करण्यात आलेल्या या सार्वजनिक अपमानामुळे अनुष्का प्रचंड मानसिक तणावाखाली गेली होती. अनुष्काच्या मैत्रिणींनी दिलेला जबाब या घटनेतील क्रूरता आणि कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा स्पष्ट करणारा आहे. मारहाण झाली त्या दिवशी अनुष्का दिवसभर कुणाशीही ▶ उर्वरित पान २ वर

# 'लोकेशन' कळू नये म्हणून मोबाईल दुसरीकडे ठेऊन घरफोडी, सख्खे भाऊ अटकेत

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील सराटेवडगाव येथील शेळके वस्तीवर ४ जानेवारीच्या मध्यरात्री झालेल्या जबरी चोरीच्या घटनेचा अंभोरा पोलिसांनी यशस्वी छडा लावला आहे. १७ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पथकाने १५० किलोमीटरची शोधमोहीम राबवून, चोरीतील दोन सख्ख्या भावांना त्यांच्या घरातून अटक केली.

अक्षय गारमन चव्हाण (२३) आणि रिजवान गारमन चव्हाण (२०, रा. शेरी बुद्रुक) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

सराटेवडगाव येथे ग्यानबा राजपुरे यांच्या घराचा दरवाजा तोडून चोरट्यांनी मारहाण करत दागिने आणि रोकड लंपास केली होती. सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी तातडीने तपासचक्र फिरवून सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषण केले. चोरटे आष्टी तालुक्यातील शेरी येथील असल्याची खात्री पटताच, मंगळवारी पहाटे पोलिसांनी आरोपींच्या घराला वेढा घातला. आरोपी गाढ झोपेत असतानाच पोलिसांनी त्यांच्या दारात उभे राहून मुसक्या आवळल्या.

चोरट्यांची नवी 'मोडस ऑपरेंडी' उघड पोलीस तपासात चोरट्यांची एक धक्कादायक पद्धत समोर आली आहे. चोरीला जाताना हे आरोपी स्वतःचे मोबाईल दुसऱ्या तालुक्यात किंवा जिल्ह्यात ठेवतात, जेणेकरून त्यांचे लोकेशन सापडू नये. गुन्ह्यासाठी ते वेगळी सिमकार्डे आणि मोबाईल वापरतात. मात्र, अंभोरा पोलिसांनी १५० किलोमीटर परिसरातील सीसीटीव्ही आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे या हुशारीला मात दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय मंगेश साळवे आणि त्यांच्या पथकाने केली. फरार असलेल्या इतर आरोपींचा शोध आता पोलीस घेत आहेत.







# गरिबीविरुद्ध लढा : मानवी वेदनांपासून सामाजिक न्यायापर्यंतचा संघर्ष



मानवी इतिहासात विविध संस्कृती, राज्यव्यवस्था आणि आर्थिक पद्धती उदयास आल्या, नष्ट झाल्या ; परंतु गरिबी हा प्रश्न मात्र प्रत्येक काळात वेगवेगळ्या स्वरूपात टिकून राहिलेला दिसतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि प्रगतीच्या घोषणांमध्येही गरिबीचे अस्तित्व आजही वास्तव आहे. ०८ जानेवारी रोजी साजरा होणारा गरिबीविरुद्ध लढा दिन (थरीं प झेंशिंीं ूअू) हा केवळ एखाद्या सामाजिक घटनेची आठवण करून देणारा दिवस नसून, तो समाजाच्या अंतःकरणाला प्रश्न विचारणारा आणि विकासाच्या संकल्पनेला पुन्हा तपासण्यास भाग पाडणारा दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, गरिबी ही केवळ पैशाच्या अभावाची समस्या नसून, ती मानवी प्रतिष्ठा, सामाजिक संधी, समानता आणि न्याय यांच्याशी निगडित असलेली एक खोल सामाजिक समस्या आहे.

गरिबीचा विचार करताना समाजशास्त्र तिच्याकडे एक बहुआयामी सामाजिक वास्तव म्हणून पाहते. गरिबी म्हणजे केवळ दोन वेळचे अन्न न मिळणे नाही ; तर शिक्षण, आरोग्य, सुरक्षित निवारा, सन्मानजनक रोजगार, सामाजिक संरक्षण, आणि समाजातील निर्णयप्रक्रियेत सहभाग यांपासून वंचित राहणे होय. अनेक वेळा एखादी व्यक्ती गरीब असण्याचे कारण तिच्या वैयक्तिक क्षमतेपेक्षा ती ज्या सामाजिक रचनेत जन्माला येते, त्या रचनेतील असमानता असते. जात, वर्ग, लिंग, धर्म, प्रदेश आणि शिक्षण या घटकांवर आधारित भेदभावामुळे समाजातील काही गट कायमस्वरूपी गरिबीच्या कडेलोटावर उभे राहतात. म्हणूनच गरिबी ही वैयक्तिक अपयश नसून, ती सामाजिक व्यवस्थेतील अन्यायाचे प्रतिबिंब आहे.

भारतीय समाजाच्या संदर्भात गरिबीचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आणि बहुआयामी आहे. भारतात आर्थिक विकासाच्या अनेक योजना राबविल्या गेल्या, औद्योगिकीकरण झाले, शहरीकरण वाढले आणि सेवा क्षेत्र विस्तारले ; मात्र या विकासाचा लाभ सर्वसामान्य माणसापर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. ग्रामीण भागात आजही शेतीवर अवलंबून असलेली कुटुंबे हवामानातील अनिश्चितता, उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि कर्जबाजारीपणामुळे गरिबीत अडकलेली आहेत. दुसरीकडे शहरी भागात रोजगाराच्या संधी असल्या, तरी झोपडपट्ट्यांमधील जीवन, अपुऱ्या मूलभूत सुविधा, असुरक्षित कामकाज आणि सामाजिक संरक्षणाचा अभाव यामुळे शहरी गरिबीचे वेगळेच भयावह स्वरूप दिसून येते. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे स्पष्ट होते की गरिबी ही ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही पातळ्यांवर सामाजिक विकासाला मोठे आव्हान ठरते.

गरिबीचा सर्वाधिक फटका समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना बसतो. अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक समुदाय, महिला, अपंग व्यक्ती आणि स्थलांतरित कामगार हे घटक सामाजिक व आर्थिक दोन्ही स्तरांवर असुरक्षित असतात. विशेषतः महिलांच्या बाबतीत गरिबीचे स्वरूप अधिक तीव्र असते. शिक्षणाच्या संधींचा अभाव, रोजगारातील भेदभाव, कमी मजुरी, असुरक्षित कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्यांचा भार यामुळे महिला दुहेरी शोषणाचा सामना करतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे दिसते की महिलांचे सक्षमीकरण केल्याशिवाय गरिबीविरुद्धचा लढा यशस्वी होऊ शकत नाही.

गरिबीविरुद्ध लढा दिनाचे महत्त्व यासाठी अधोरेखित करावे लागते की हा दिवस समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देतो. विकासाचा अर्थ नेमका काय, हा प्रश्न हा दिवस उपस्थित करतो. केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढणे, मोठे प्रकल्प उभे राहणे किंवा आकडेवारीत सुधारणा होणे म्हणजे विकास नव्हे. खरा विकास तोच, ज्यामध्ये समाजातील शेवटच्या माणसाचे जीवनमान सुधारते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ज्या समाजात संपत्ती काही मोजक्या लोकांकडे केंद्रीत होते आणि बहुसंख्य लोक मूलभूत गरजांसाठी संघर्ष करतात, तो समाज समतोल आणि न्याय्य ठरत नाही. म्हणून गरिबीविरुद्धचा लढा हा समतामूलक समाजनिर्मितीचा संघर्ष आहे.

शिक्षण हे गरिबीविरुद्धच्या लढ्यातील सर्वात प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीला रोजगाराच्या संधी मिळतात, सामाजिक जाणीव विकसित होते आणि आत्मविश्वास निर्माण होतो. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली गरिबीची साखळी तोडण्याची ताकद शिक्षणात आहे. मात्र गरीब कुटुंबांतील मुलांना शिक्षणापर्यंत पोहोचताना अनेक अडथळे येतात. आर्थिक अडचणी, बालमजुरी, शाळा सोडण्याचे प्रमाण, मुलींच्या शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष आणि डिजिटल साधनांचा अभाव यामुळे शिक्षणातील विषमता वाढते. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, शिक्षणव्यवस्थेतील ही विषमता दूर करणे हे गरिबी निर्मूलनासाठी अत्यावश्यक आहे.

आरोग्य आणि गरिबी यांचा संबंधही अतिशय घनिष्ठ आहे. गरीब कुटुंबांमध्ये आजारपण हे केवळ शारीरिक त्रासापुरते मर्यादित न राहता, ते आर्थिक संकटाचे कारण ठरते. उपचाराचा खर्च, काम करण्याची क्षमता कमी होणे आणि दीर्घकालीन आजार यांमुळे कुटुंब अधिक गरिबीत ढकलले जाते. समाजशास्त्रीय अभ्यासातून हे स्पष्ट होते की सार्वत्रिक, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध झाल्यास गरिबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. म्हणून सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेचा बळकटीकरण हा गरिबीविरुद्धच्या लढ्यातील महत्त्वाचा घटक आहे.

रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा गरिबीविरुद्धच्या संघर्षाचा केंद्रबिंदू आहे. बेरोजगारी आणि अल्परोजगारी ही गरिबीची प्रमुख कारणे आहेत. विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांना कमी मजुरी, सामाजिक सुरक्षा नसणे आणि रोजगाराची अनिश्चितता यांचा सामना करावा लागतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, केवळ रोजगारनिर्मिती पुरेशी नसून, सन्मानजनक, सुरक्षित आणि टिकाऊ रोजगार उपलब्ध होणे आवश्यक आहे. कौशल्यविकास, स्वयंरोजगार, सहकारी चळवळी आणि स्थानिक संसाधनांवर आधारित उद्योग यांमुळे आर्थिक स्वावलंबन वाढू शकते.

गरिबीविरुद्धच्या लढ्यात शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अन्नसुरक्षा, रोजगार हमी, निवारा, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक समावेशनाच्या योजना गरिबांसाठी आधारस्तंभ ठरू शकतात. मात्र समाजशास्त्रीय अभ्यास सांगतो की योजनांचा प्रत्यक्ष लाभ गरजूंपर्यंत पोहोचण्यासाठी पारदर्शक अंमलबजावणी, प्रशासनाची संवेदनशीलता आणि लोकसहभाग अत्यावश्यक आहे. केवळ योजना जाहीर करणे पुरेसे नसून, त्या प्रभावीपणे राबविल्या गेल्या पाहिजेत. स्वयंसेवी संस्था, सामाजिक चळवळी आणि स्थानिक समुदाय यांची भूमिका गरिबी निर्मूलनात अत्यंत मोलाची आहे. तळागाळातील गरजा ओळखून स्थानिक पातळीवर उपाययोजना राबविण्याची क्षमता या संस्थांकडे असते. महिला स्वयं-सहायता गट, ग्रामविकास उपक्रम, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम आणि सामाजिक उद्योजकता यांमुळे अनेक कुटुंबांचे जीवनमान सुधारले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे उपक्रम सामाजिक ऐक्य आणि सहभाग वाढवतात, जे दीर्घकालीन बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानालाही गरिबीविरुद्धच्या लढ्यात महत्त्वाचे स्थान आहे. डिजिटल सेवा, ऑनलाइन शिक्षण, थेट लाभ हस्तांतरण आणि माहितीपर पोहोच यांमुळे अनेक अडथळे कमी झाले आहेत. मात्र डिजिटल दरी ही नवीन सामाजिक विषमता निर्माण करत आहे. गरीब आणि वंचित घटकांना तंत्रज्ञानाचा समान लाभ मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत.

गरिबीविरुद्ध लढा दिन आपल्याला ठामपणे सांगतो की गरिबी निर्मूलन हा दयेचा नव्हे, तर **हक्कांचा आणि न्यायाचा प्रश्न** आहे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. अन्न, शिक्षण, आरोग्य, निवारा आणि रोजगार हे मूलभूत मानवी हक्क आहेत. जोपर्यंत समाजातील शेवटच्या घटकाचे जीवनमान उंचावत नाही, तोपर्यंत विकास अपूर्णच राहतो.

अखेरीस, ०८ जानेवारी, गरिबीविरुद्ध लढा दिन हा केवळ स्मरणाचा नव्हे, तर कृतीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. गरिबी ही अटळ नियती नसून, ती मानवनिर्मित सामाजिक वास्तव आहे आणि त्यामुळे ती बदलण्याची ताकदही मानवाकडेच आहे. सामाजिक संवेदनशीलता, समतामूलक धोरणे, लोकसहभाग आणि मानवी मूल्यांवर आधारित विकासाच्या मार्गानेच गरिबीवर मात करणे शक्य आहे. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच, जिथे कोणतीही व्यक्ती उपेक्षित, वंचित किंवा दुर्लक्षित राहत नाही. गरिबीविरुद्धचा लढा हा एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता, तो आपल्या दैनंदिन सामाजिक जबाबदारीचा अविभाज्य भाग बनवणे, हीच या दिवसाची खरी सार्थकता आहे.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान १ वरून पुढे...

## आरक्षण मिळाल्यानंतर...

प्रवर्गातील उमेदवारांचा समावेश शॉर्टलिस्टिंगच्या टप्प्यावरच जनरल यादीत करणे आवश्यक आहे. राजस्थान उच्च न्यायालयाच्या २,७५६ पदांच्या भरती प्रक्रियेत (कनिष्ठ न्यायिक सहाय्यक व लिपिक) काही आरक्षित प्रवर्गांचा कट ऑफ जनरलपेक्षा जास्त होता. त्यामुळे जनरल कट-ऑफपेक्षा जास्त गुण असूनही काही उमेदवारांना टायपिंग टेस्टपासून वंचित ठेवण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने या उमेदवारांचा दावा मान्य करत, डबल बेनिफिटचा युक्तिवाद फेटाळला.

कर्नाटक प्रकरण : सवलत घेतली, त्यामुळे दावा फेटाळला

कर्नाटक प्रकरण २०१३ च्या IFS परीक्षेशी संबंधित होते. प्रीलिम्समध्ये जनरल कट-ऑफ २६७, तर SC साठी सवलतीचा कट ऑफ २३३ होता. जी. किरण यांनी २४७ गुण मिळवून सवलतीच्या आधारे पात्रता मिळवली. अंतिम गुणवत्तायादीत त्यांची रँक १९, तर जनरल प्रवर्गातील अँटनी यांची ३७ होती. मात्र, कर्नाटकात केवळ एकच जनरल इनसाइडर जागा उपलब्ध असल्याने केंद्र सरकारने ती अँटनी यांना दिली. कर्नाटक उच्च न्यायालयाने किरण यांच्या बाजूने निकाल दिला होता, पण सर्वोच्च न्यायालयाने तो रद्द केला. न्यायालयाने स्पष्ट केले की, IFS परीक्षा ही एक सलग आणि एकत्रित निवड प्रक्रिया आहे. प्रीलिम्समध्ये घेतलेली सवलत पुढील टप्प्यांमध्ये दुर्लक्षित करता येत नाही. न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने आज कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध केंद्र सरकारच्या याचिकेला परवानगी देताना उपरोक्त निरीक्षणे नोंदवली.

## वैभव सूर्यवंशीचं...

एरॉन जॉर्ज हा राईट हॅन्डेड टॉप ऑर्डर बॅटर आहे. याआधी एरॉन जॉर्जने वैभव सूर्यवंशीसोबत अंडर-१९ आशिया कपमध्ये भारताचं प्रतिनिधीत्व केलं होतं. हैदराबादमध्ये लहानाचा मोठा झालेल्या एरॉनने एज-ग्रुप

◆ पान १ वरून पुढे...

क्रिकेटपासूनच छाप पाडायला सुरूवात केली, यामुळे त्याची देशांतर्गत यूथ टुर्नामेंट आणि राज्याच्या वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये निवड झाली. जॉर्जने विनू मांकड ट्रॉफीसारख्या स्पर्धांमध्येही भाग घेतला, ज्याच्या दोन मोसमांमध्ये त्याने ३४१ आणि ३७३ रन केले. बिहारविरुद्ध नाबाद ३०३ रन केल्यानंतर जॉर्ज २०२२-२३ विजय मर्चंट ट्रॉफीमध्ये टीमचं नेतृत्व करत आहे.

वडिलांचं स्वप्न तुटलं

जॉर्जने मागच्या वर्षी २०२५ च्या अंडर-१९ आशिया कपमध्ये पाकिस्तानविरुद्ध अर्धशतक केलं. ८५ रनच्या या खेळीनंतर त्याची तुलना संजू सॅमसनसोबत केली जाऊ लागली. एरॉन जॉर्जच्या वडिलांचं नाव इसो वर्गीस आहे. इसो यांनाही क्रिकेटपटू व्हायचं होतं, पण पाठिंबा न मिळाल्यामुळे त्यांचं हे स्वप्न पूर्ण झालं नाही. आपल्याला क्रिकेट खेळता आलं नाही, म्हणून इसो यांनी मुलाला क्रिकेटपटू बनवायचं ठरवलं. आता वडिलांचं हे स्वप्न एरॉन पूर्ण करत आहे.

एबी डिव्हिलियर्सला हिरो मानतो जॉर्ज

एरॉन जॉर्ज हा दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू एबी डिव्हिलियर्सला त्याचा हिरो मानतो. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये एरॉन जॉर्जने याबद्दल खुलासा केला होता. एबी डिव्हिलियर्सची रेंज, कोणत्याही बॉलवर शॉट मारण्याची क्षमता, हे कौशल्य आहे. एका बॉलवर दोन किंवा त्यापेक्षा जास्त शॉट असणं तुम्हाला वेगळं करतं. मला मैदानात त्याचा शांत स्वभाव खूप आवडतो. तो मैदानावर वाद घालत नाही, क्रिकेटच्या मैदानात तो खरा जेंटलमन आहे', असं जॉर्ज म्हणाला होता.

## रेल्वेमार्गे अन्नधान्य...

सुरक्षित वाहतूक कशी सुनिश्चित करता येईल, वाहतूक खर्चात कशी बचत करता येईल, तसेच रेल्वे नेटवर्कचा अधिक प्रभावी आणि नियोजनबद्ध वापर कसा करता येईल, याबाबत विविध मुद्द्यांवर सविस्तर विचारमंथन करण्यात आले. अन्नधान्याच्या साठवण, वाहतूक व वितरण प्रक्रियेत

◆ पान १ वरून पुढे...

येणाऱ्या अडचणी, विलंब व खर्च यावर उपाययोजना सुचविताना रेल्वेमार्गे वाहतूक अधिक बळकट करण्यावर भर देण्यात आला. विशेषत: सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी रेल्वे आणि एफसीआय यांच्यातील समन्वय वाढविणे, आधुनिक लॉजिस्टिक व्यवस्थेचा वापर, तसेच तंत्रज्ञानाधारित उपाययोजना राबविण्याबाबत चर्चा झाली. अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा व उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. शेतकरी, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अन्नधान्य पुरवठा साखळी अधिक मजबूत, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी सांगितले, अन्नधान्याची वेळेत व सुरक्षित वाहतूक ही देशाच्या अन्नसुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची असून, रेल्वेमार्गाचा प्रभावी वापर झाल्यास खर्चात बचत होऊन सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक सक्षम होईल. या दृष्टीने संसदीय स्थायी समितीच्या माध्यमातून ठोस निर्णय व शिफारसी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## संजय राऊतांचा...

फोडली. एकनाथ शिंदे आणि चाळीस लोंकाना तुम्ही ब्लॅकमेल करून फोडलं. अशोक चव्हाण यांना ब्लॅकमेल करून फोडलं. तुमचा धंदा ब्लॅकमेलिंगचा आहे, तुम्ही ग्रेट गॅमलर आणि ग्रेट ब्लॅकमेलर आहात आणि तेच दिसत आहे.

भाजपचे नेते महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवार यांच्या विधानावर भाष्य करताना इतिहासाची पाने उघडायला भाग पाडू नका असे विधान करून इशारा दिला. यावर बोलताना संजय राऊत म्हणाले, बावनकुळे काय न्यायाधीश झाले आहेत का ? की तपास अधिकारी ? तुमचे वैचारिक मतभे आहेत. बावनकुळे काय बडबडत आहेत. फडणवीस काय बोलतात आहेत. मग बसवा त्यांना समोर आणि द्या त्यांना सावकरांचे धडे

◆ पान १ वरून पुढे...

अशा आक्रमक शैलीत राऊतांनी भाजपवर टीका केली आहे.

## ज्याची भीती...

बोलली नव्हती आणि ती रडतही नव्हती, ती केवळ शांत आणि निराश होती. तिचा हा बदललेला स्वभाव पाहून तिच्या मैत्रिणींना काहीतरी अघटित घडण्याची भीती वाटली होती. त्यांनी वॉर्डन आणि आया यांना विनंती केली होती की, आज अनुष्काची काळजी घ्या, तिला एकटे सोडू नका आणि तिला सोबत घेऊन झोपा. मात्र, या महिला कर्मचाऱ्यांनी मुलींच्या या बोलण्याकडे सपशेल दुर्लक्ष केले आणि कोणतीही खबरदारी घेतली नाही.

जर महिला कर्मचाऱ्यांनी आमचे ऐकले असते, तर आज आमची मैत्रीण जिवंत असती, अशी काळजाला भिडणारी भावना तिच्या मैत्रिणींनी व्यक्त केली आहे. अनुष्का ज्या रुममध्ये राहायची, त्याच खोलीत वॉर्डन पल्लवी कणसे आणि आया लता गायकवाड यांचंही वास्तव्य होतं. इतक्या जवळ असूनही त्यांनी अनुष्काच्या मानसिक स्थितीकडे दुर्लक्ष केलं. केवळ संशयावरून एका विद्यार्थिनीला सर्वांसमोर मारहाण करून तिचा मानसिक छळ करणं हे कायद्याने गुन्हा असतानाही, या वॉर्डनने अधिकाराचा गैरवापर केल्याचे स्पष्ट झालं आहे. पालकांच्या तक्रारीनंतर आता या दोन्ही महिला आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

गेल्या २ वर्षात तिसरी मोठी घटना- दरम्यान, लातूरच्या या नवोदय विद्यालयातील गंभीर घटनांची ही मालिका आता पालकांसाठी चिंतेचा विषय ठरली आहे. मार्च २०२४ मध्ये एका शिक्षकाने मुलांचे शोषण केल्याचा प्रकार येथे घडला होता. त्यानंतर केवळ ६ महिन्यांपूर्वी स्वच्छतागृहाचे पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळल्याने १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली होती. आता अनुष्काच्या आत्महत्येच्या रूपाने गेल्या २ वर्षात तिसरी मोठी घटना समोर आली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीड चे पालकमंत्री....

पडली, तर काही झाडे पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याकडे जिल्हा प्रशासनानेजाणीवपूर्वकडोळेझाककेल्याचाआरोपडॉ.ढवळेयांनीकेलाआहे.

पालकमंत्र्यांची दिशाभूल ?- जिल्हाधिकाऱ्यांनी वर्षभरात १ कोटी रोपे लावण्याचा संकल्प जाहीर केला असला, तरी प्रत्यक्षात वृक्षसंगोपनाची जबाबदारी झटकली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत पुढील चार वर्षांत १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असल्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी स्पष्ट केले होते. मात्र हे स्वप्न फक्त कागदोपत्रीच पूर्ण केले जात असल्याचा आरोप आता पुढे येत आहे. इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवून सन्मान स्वीकारण्यापेक्षा, जमिनीवर लावलेल्या झाडांचे प्राण वाचवणे अधिक गरजेचे आहे. वृक्षलागवडीचे इव्हेंट करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांनी आता तरी प्रत्यक्ष जबाबदारी घ्यावी, अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## अंबाजोगाईच्या सर्वांगीण....

कमी करून नियमित करण्यावर त्यांनी भर दिला असून पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याच्या सूचना पाणीपुरवठा विभागाला दिल्या आहेत. सार्वजनिक स्वच्छतेच्या मुद्द्यावर भाष्य करताना त्यांनी स्वच्छतेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. पूर्वीच्या कंत्राटदाराने काम सोडल्याने लवकरच नवीन निविदा प्रक्रिया राबवली जाईल, तोपर्यंत नादुरुस्त घंटागाड्या दुरुस्त करून आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून शहर चकाचक ठेवण्याचे आदेश त्यांनी दिले.

विद्युत विभागाच्या आढाव्यादरम्यान त्यांनी संपूर्ण शहरात कुठेही अंधार राहणार नाही याची खबरदारी घेण्यास सांगितले. ज्या भागात पथदिव्यांचा प्रकाश कमी आहे, तिथे तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी

◆ पान ४ वरून पुढे...

दिल्या आहेत. विशेष म्हणजे भविष्यात शहरातील सर्व पथदिवे सौरऊर्जे वर कार्यान्वित करण्याचे नियोजन असून त्यादृष्टीने पाहणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी त्यांनी ऐतिहासिक निर्णय घेतला असून आता सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यास जन्म प्रमाणपत्र अर्ज केल्याच्या दुसऱ्या दिवशी उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच नगरपालिकेत येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी बैठक व्यवस्था आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचे निर्देशही प्रशासनाला दिले आहेत.

यावेळी नगराध्यक्षांनी कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींना भ्रष्टाचाराबाबत कडक इशारा दिला. नागरिकांशी सन्मानाने वागणे बंधनकारक असून कोणत्याही कामासाठी पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी स्पष्ट शब्दांत दिला. आपल्यापासून काहीही लपून राहत नाही, त्यामुळे पारदर्शकपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. नगरसेवक आणि कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे आणि काही अडचणी असल्यास थेट संपर्क साधावा, असे सांगत सर्वांनी मिळून अंबाजोगाईच्या विकासासाठी जनसेवक म्हणून कटिबद्ध राहण्याची ग्वाही त्यांनी या बैठकीत दिली.

## महाराष्ट्र लोकसेवा...

सदर परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांचेकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाता येणार नाही. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा /अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन येण्यास परवानगी देण्यात येत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेले परीक्षेचे केवळ आवश्यक साहित्य उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील, तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबतच त्यांचे स्वतः चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हींग

◆ पान ४ वरून पुढे...

लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांना त्यांचे परीक्षा उपकेंद्रावर सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहणेबाबत याव्दारे सूचित करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजे नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## चौसाळा पत्रकार...

देऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमास नेकनूर पोलीस स्टेशनचे हेड कॉलेज टेबल राठोड, बळवंत साहेब, चौसाळा चौकीचे सचिन गर्जे तसेच पत्रकार संघाचे मार्गदर्शक बळीराम राऊत, चौसाळा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष प्रसाद देशमुख, चौसाळा पत्रकार संघाचे नूतन अध्यक्ष खाजा मिया जागीरदार, उपाध्यक्ष लहू नाईकवाडे, मिराज मुलाने तसेच जिल्हा परिषद शाळेतील सर्व कर्मचारी विद्यार्थी वर्ग उपस्थित होते

## तलवाडा पोलीस...

स्टाफच्या वतीने मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६ रोजी मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृति दिनानिमित्त सामाजिक दायित्व म्हणून हाद्दीतील सर्व पत्रकार बांधवांना सन्मानपर गुलाब पुष्प व पेन, देऊन सम्मानित करण्यात आले. यावेळी पत्रकार सुरेश गांधले, राजेंद्र विटकर, सचिन डोंगरे, अल्ताफ कुरेशी, सुमेध करडे, बापू गाडेकर, सुभाष शिंदे यांनी आप आपले मनोगत व्यक्त करुन तलवाडा पोलीस स्टेशनच्या सर्व पदाधिकारी प्रती आभार व्यक्त केले. तत्पूर्वी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी तलवाडा पोलीस स्टेशन हाद्दीतील सर्व पत्रकार बांधवांची आवर्जून उपस्थिति होती.

◆ पान ४ वरून पुढे...

## गंगाभारती महाराज...

१५ ऑगस्ट २०२५ रोजी पालकमंत्री अजितदादा पवार यांनाही ठेवीदारांनी निवेदन दिले होते. मात्र, केवळ आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

ठेवीदारांच्या प्रमुख मागण्या- पतसंस्थेतील अपहार प्रकरणातील सर्व दोषींना तात्काळ अटक करावी, ठेवीदारांचे पैसे व्याजासह परत मिळावेत अहवाल सादर न करणाऱ्या लेखापरीक्षकावर कठोर कारवाई करावी, दोषी सापडत नसतील, तर शासनाने ठेवीदारांचे पैसे स्वतः अदा करावेत. याशिवाय, ५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या बैठकीत लातूरचे विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी थकीत कर्जदारांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले असून, त्या आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

अनेक ठेवीदारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. आता न्याय मिळेपर्यंत शांत बसणार नाही, असा इशारा बीड युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर, यांनी दिला आहे.

## कौशल्य, रोजगार...

प्रशिक्षण योजना सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. नोंदणी करण्यासाठी https://forms.gle/3P31ctUG6MQtsH2K6 गूगल फॉर्म भरावा. या गूगल फॉर्ममध्ये आपल्या जवळील तालुक्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) आणि शासकीय तंत्र प्रशाला केंद्र मध्ये उपलब्ध असणारे प्रशिक्षण कोर्स निवडावेत. जास्तीत जास्त इच्छुक पात्र उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी गुगल फॉर्म भरून नोंदणी करावी. असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त, समाधान किरवले, बीड यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# काळ्या थारवर ४ जण तुटून पडले, इम्तियाज जलील यांचा हात ओढला; छत्रपती संभाजीनगरमध्ये राडा

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरमधील बायजीपुरात राडा झाल्याची घटना समोर आली आहे. एमआयएम नेते इम्तियाज जलील यांना चार जणांकडून मारहाण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. इम्तियाज जलील यांच्या थारवर चारजण मारहाण करण्यासाठी तुटून पडले. यादरम्यानचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. इम्तियाज



जलील यांची पदयात्रा झाल्यावर




जात असताना छत्रपती संभाजीनगर महापालिकेतील काँग्रेस आणि वंचितचे उमेदवार कलीम कुरेशी यांच्या कार्यकर्त्यांकडून इम्तियाज जलील यांच्या थारवर हल्ला करण्यात आला. यावेळी थारमध्ये पुढच्या सीटवर बसलेल्या इम्तियाज जलील यांचा हात ओढून चार जणांनी मारहाण करण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांच्यासमोर हल्ला झाला. खूनी लोकांची हिम्मत इतकी वाढली आहे. रीतसर परवानगी घेऊन रॅली काढण्यात आली. पीआय आणि त्यांची संपूर्ण पोलीस फोर्स तिथे होते. आता ते काय कारवाई करणार हेच आम्ही पाहतोय.अशाप्रकारे गुंडगिरी करून निवडणूक लढता येत नाही. ही गुंडगिरी आम्ही सहन करणार नाही, असं इम्तियाज जलील म्हणाले.

बायजी क्रमांक गल्ली २० मध्ये रॅली सुरु होती, त्यावेळी कलीम कुरेशींच्या कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवले गेले. त्यानंतर काही काळ शांत वातावरण होतं. पुन्हा रॅली पुढं गेल्यानंतर हा प्रकार घडल्याचं सांगितलं गेलं. दोन्ही घटना नाराज कार्यकर्त्यांनी केल्याचा, कलीम कुरेशी आहेत, त्यांच्याकडून प्रकार केला गेल्याचा आरोप इम्तियाज जलील यांनी केला आहे. कलीम कुरेशी हा प्रभाग ९ मधून वंचितचा उमेदवार आहे आणि १४ मधून काँग्रेसचा उमेदवार आहे. कलीम कुरेशींनी इम्तियाज जलील यांच्यावर पूर्ववैमनस्यातून हल्ला केल्याचा आरोप एमआयएम कार्यकर्त्यांनी केला आहे. तर हे सगळं एमआयएमनेच घडवून आणल्याचा दावा कलमी कुरेशींनी केला आहे.

## छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रास तज्ज्ञ प्राध्यापकांची आवश्यकता

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

सैन्यदल भरती पूर्व प्रशिक्षण देणाऱ्या छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे विविध विषयांवरील तज्ज्ञ प्राध्यापकांची प्रति तासिका तत्त्वावर आवश्यकता असल्याचे प्रभारी अधिकारी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्राच्या वतीने कळविले आहे.

छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात सीडीएस ६६- दि.१९ जानेवारी ते दि.३ एप्रिल, सीडीएस-६७- दि.१५ जून ते दि.२८ ऑगस्ट या कालावधीतील प्रशिक्षणासाठी इंग्रजी, गणित, सामान्य विज्ञान-१- सामान्य ज्ञान, इतिहास, भुगोल, भारतीय राजकारण, सामान्य विज्ञान २- अर्थशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या विषयांसाठी तज्ज्ञ प्राध्यापकांची आवश्यकता आहे. त्यासाठी संबंधित अभ्यासक्रमाशी निवडीत पदवीधर, पदव्युत्तर तज्ज्ञ प्राध्यापक, किमान दोन वर्ष स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम शिकवण्याचा अनुभव असलेल्या उमेदवाराने आपल्या कागदपत्रांसह दि.९ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वा. मुलाखतीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नाशिक रोड, नाशिक येथे उपस्थित रहावे असे आवाहन ले. कर्मल विलास शंकर सोनवणे (नि.) प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी ९१५६०७३३०६ व ०२५३-२४५१०३२ वर संपर्क करावे असे आवाहन केले आहे.

## नात्यांचा गुंता; भावजयसोबत प्रेमसंबंध अन् काकाने १३ वर्षांचा पुतण्याला संपवलं, मग २४ तासात...

**धाराशिव। प्रतिनिधी**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलिस स्टेशनच्या हद्दीत दीर-भावजयीच्या प्रेमसंबंधांची पोलखोल वडिलांपर्यंत पोहोचवत असल्याचा राग मनात धरून चुलत्याने आपल्या १३ वर्षीय पुतण्याचा दिवसाढवळ्या निर्घृण खून केला. ही संतापजनक घटना तामलवाडी साठवण तलावाजवळ उघडकीस आली आहे. मात्र, सहाय्यक पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तामलवाडी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत खुनाचा छडा लावत आरोपीला बेड्या ठोकल्या.सोलापूर - धुळे



राष्ट्रीय महामार्गालगत तामलवाडी शिवारात कदम यांची शेती आहे. सदर शेती दत्ता कोरे हे बटाईने करीत होते. उमरगा तालुक्यातील कोळसूर गावचा ओमकार देवीदास कांबळे हा आपल्या भावजय ज्योती कांबळे हिच्यासह सालगडी म्हणून काम करत होता. ज्योती कांबळे यांचा १३ वर्षीय मुलगा कृष्णा उर्फ सदानंद कांबळे हा कधी वडिलांकडे तर कधी आईकडे राहत होता. कृष्णा हा आई आणि चुलता यांच्यातील अनैतिक संबंधांची माहिती आपल्या वडिलांना देत असल्याने तो दीर-भावजयीच्या प्रेमसंबंधात अडसर ठरत होता. याच रागातून १ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास, आरोपी ओमकार कांबळे याने तलावातील पाणी उपसा करणाऱ्या विद्युत पंपाचा पाईप बसवण्याच्या बहाण्याने कृष्णाला तामलवाडी साठवण तलावाजवळ नेले. तेथे कुऱ्हाडीचे सपासप वार करून कृष्णाचा निर्घृण खून केला आणि मृतदेह तलावाशेजारील गवतामध्ये फेकून आरोपी पसार झाला.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या विद्यार्थ्यांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर दिनांक ३१ डिसेबर २०२५ पर्यंत स्विकारण्यात आलेले होते. सन २०२५-२६ या वर्षासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे ऑनलाईन भरलेले अर्ज विद्यार्थ्यांनी दि. ८ ते १६ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी १०.३० ते ४.३० पर्यंत सहायक आयुक्त, समाज कल्याण जालना या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजु एडके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी अकरावी, बारावी तसेच बारावी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात, शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणीक साहित्य

## माहेरुन १५ लाखांची मागणी, पतीसह सासू - सासऱ्यांकडून छळ, विवाहितेला बाळासह घराबाहेर काढलं

**बीड । प्रतिनिधी**

घर बांधण्यासाठी माहेरहून १५ लाख रुपये घेऊन येण्याची मागणी करत सासरच्या मंडळींनी महिलेला उपाशी ठेवून, तिला मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बाळासह घराबाहेर हाकलून देत दिली जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी अजय रामेश्वर जाधवर (पती), रामेश्वर अर्जुन जाधवर (सासरा) आणि रमा रामेश्वर जाधवर (सासू) या तिघांविरूद्ध केज येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.मिळालेल्या




माहितीनुसार, बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील रहिवाशी शीतल हिचा विवाह ३ वर्षापूर्वी धाराशिव जिल्ह्यातील वडजी येथील रहिवाशी अजय रामेश्वर जाधवर यांच्यासोबत झाला होता. लग्नानंतर एक वर्ष सासरच्यांनी शीतलला चांगलं सांभाळलं.

परंतु, पती अजय जाधवरला ऑनलाइन गेमची सवय लागल्यामुळे त्याच्यावर मोठ्या प्रमाणात खासगी सावकारांचं कर्ज झालं. त्यानंतर त्याने शीतलचा छळ करण्यास सुरुवात झाली. तिला सतत मानसिक त्रास दिला जाऊ लागला. याबाबत शीतलने तिच्या आई-वडिलांना सांगितलं. तिच्या घरच्यांना असं वाटलं, की कदाचित कर्ज झालं आहे म्हणून सासरचे लोक चिडचिड करत असतील, त्यांना सावरून घेऊ म्हणून ठरवलं.दीड महिन्यापूर्वीच शीतलच्या आई - वडिलांनी त्यांची जमीन विकून ३ लाख रुपये शीतलच्या सासरच्या लोकांना दिले होते. परंतु, त्यानंतरही पती अजय जाधवर हा पत्नी शीतलला कॉल करून खासगी सावकारांना कॉलवर बोलण्यासाठी जबरदस्ती करत होता. नाही बोललीस तर बाळासह तुला जीवे मारून टाकीन म्हणून धमकी देत होता. याच कारणावरुन शीतलला सारखा मानसिक त्रास सहन करावा लागत होता. या प्रकरणाने शीतलचे आई-वडील देखील तणावाखाली होते. अशी सर्व माहिती फिर्यादीत दिली आहे.

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विद्यार्थिनींच्या वक्तृत्वाला व्यासपीठ

**बीड । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले जयंती व जिजाऊ-सावित्री जन्मोत्सव २०२६ निमित्त श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके होते. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका एस. डी. कदम यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. स्पर्धे



त बीड शहरातील २२ शाळांतील विद्यार्थिनी सहभागी झाल्या. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. अशोक घोळवे व प्रा. डॉ. नवनाथराव पवळे यांनी काम पाहिले. स्पर्धेत द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयच्या भाग्यश्री सतीश जेथलिया हिने प्रथम, स्वा. सावरकर विद्यालयाच्या श्रिया सोनाली शहाणे हिने द्वितीय, तर राजर्षी शाहू कन्या विद्यालयाच्या राजनंदनी बप्पासाहेब डावकर हिने तृतीय क्रमांक पटकावला. अक्षरा बाळकृष्ण पवार हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. अध्यक्षीय समारोपात प्रा. जे. पी. शेळके यांनी विद्यार्थिनींच्या वक्तृत्व व विचारशक्तीच्या विकासासाठी अशा स्पर्धा आवश्यक असल्याचे सांगितले. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांतूनच स्त्री शिक्षणाची खरी दिशा मिळते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक आर. टी. राऊत, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे यांच्यासह शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव तेलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे शेतकरी अभियान राबविण्यात आले.यावेळी शेतकरी साठी राज्यसरकार अंतर्गत विविध योजना राबवल्या जातात या योजने बद्दल व शेतकरी यांना विविध उद्योग बद्दल माहिती देण्यात आली व संस्थेचे सचिव यांनी सर्व शेतकरी यांना आधुनिक शेती बद्दल मार्गदर्शन केले व वृक्ष लागवड करण्यात आले .यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव तेजस पवार,रोहन डोळस,तेजस्विनी पवार, सदस्य व शेतकरी होते.*

## पोलीस वर्धापन दिनाच्या निमित्ताने सपोनि सानप, उपनिरीक्षक जाधवर यांच्याकडून युवकांसाठी प्रेरणादायी संवाद

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस वर्धापन दिनाच्या निमित्ताने पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे सपोनि सुभाष सानप यांनी मातोश्री विद्यालय वंजारवाडी तसेच पोलीस



उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा या ठिकाणी विद्यालयाच्या युवक-युवतींसोबत संवाद साधून त्यांना पोलीस खात्याची काम करण्याची पध्दत तसेच वाहतुकीचे नियम याविषयी संवाद साधला यावेळी चौसाळा जि.प.शाळेचे मुख्याध्यापिका हंपे मॅडम व शिक्षकवृंद उपस्थित होते तसेच पाली येथील शाळेचे मुख्याध्यापक श्री.लाड सर व विद्यालयाचे शिक्षकवृंद उपस्थित होते आणि वंजारवाडी येथील मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक नागरगोजे व शिक्षकवृंद उपस्थित होते.या अभियानात पोलीस हवालदार नागेश पायाळ, आदिनाथ मुंडे, पांडूरंग दराडे, विष्णु काकडे, त्रिंबक कुडके,

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १०/२०२६**

**कृष्णाबाई. विरूध्द- निरंक**

ज्याअर्थी **मयत नाम महादेव पि. नामदेव लांडगे हे / या दिनांक २९.११.२०२५ रोजी मौजे धोंडराई ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झालेले आहेत.

**अर्जदार- १. कृष्णाबाई भ्र. महादेव लांडगे, वय ७० वर्षे धंदा- घरकाम धोंडराई ता. गेवराई जि. बीड. २. नामदेव पि. महादेव लांडगे वय ३६ वर्षे धंदा- शेती, धोंडराई ता. गेवराई जि. बीड. ३. राजेंद्र पि. महादेव लांडगे, वय ३४वर्षे धंदा- शेती, धोंडराई ता. गेवराई जि. बीड.**

शासकीय/ निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत नाम महादेव पि. नामदेव लांडगे रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख :१३.०२.२०२६**

**(मार्फत अँड के. व्ही. दाभाडे)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११ / २०२६**

**अर्जदार - (१) केशवकुमार पि. काशीनाथ जवरे, वय- ५२ वर्षे, धंदा-नोकरी, रा. गुरूकुल नगर, गुरूकुल इंग्लीश स्कुल जवळ, जालना रोड, बीड, ता. जि. बीड. (२) गंगाधर पि. काशीनाथ जवरे, वय ५० वर्षे, धंदा- नोकरी, रा. फलॅट नं. २, गुरूदत्त अपार्टमेंट, गुरूकुल इंग्लीश स्कूल, जवळ, गुरूकुल नगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड. (३) काशीनाथ पि. नामदेव जवरे, जवाहरवाडी, ता. गेवराई, जि. बीड ह. मु. गुरुकुल नगर गुरुकुल इंग्लीश स्कूल जवळ, जालना रोड, बीड, ता. जि. बीड.** विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

प्रकरण :- भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत नामे गोदावरी भ्र. काशिनाथ जवरे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **गोदावरी भ्र. काशिनाथ जवरे, रा. गुरूकुल नगर, गुरूकुल इंग्लीश स्कुल जवळ, जालना रोड, बीड, ता. जि. बीड हे दिनांक ०७/०९/२०२५ रोजी** राहते घरी गुरूकुल नगर, गुरूकुल इंग्लीश स्कुल जवळ, जालना रोड, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ हे मयताचे पती आहेत. तसेच त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीसंबंधी मृत्युपत्र बनवलेले नाही अथवा कोणालाही नामनिर्देशीत केलेले नाही असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

मयताचे नांवे गोदावरी भ्र. काशिनाथ जवरे यांच्या नावे स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड येथील खाते क्र. ६२०५७७०५२६५ मधील रक्कम रूपये ३३,९९८ /- जमा रक्कम. उचलण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. मयत गोदावरी भ्र. काशिनाथ जवरे यांचे नांवे असलेल्या बचत खात्यामधील रक्कम व्याजासह व त्यावरील मिळणा-या लाभासह उचलनेचे अधिकार देण्यात याव्यात असे अर्जदारांनी म्हटले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक ०७/०२/२०२६**

आज दिनांक ०७/०१/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(अॅड. ए. एन. बारगजे)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २३/२०२६**

**निर्मलाबाई टेके व इतर वि. निरंक**

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः

**(१) निर्मलाबाई भ्र. सुभाष टेके, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. राजुरी न. ता.जि. बीड. २) महेश पि. सुभाष टेके, वय ३५ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ३) कल्पना पि. सुभाष टेके वय ४४ वर्षे, धंदा नौकरी, रा. इंद्रप्रस्थ सोसायटी, इरिगेशन कॉलनी, उरुळी कांचन, ता. हवेली जि. पुणे. (४) अश्विनी भ्र. अशोक बोंदर्डे, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. सोमठाणे नलवडे ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर. ५) अनुजा सुभाष टेके, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. राजुरी न ता.जि. बीड**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे सुभाष पि. सखाराम टेके हे दिनांक २१/१०/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ३ ते ५ हया मयताच्या मुली आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे सुभाष पि. सखाराम टेके यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत सुभाष पि. सखाराम टेके यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०२/२०२६ आहे.**

आज दिनांक ०६/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ ॲड ए. व्ही. मेहेत्रे)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १८०९/२०२५**

**शैलजा व इतर वि निरंक**

ज्याअर्थी **मयत नामे रविंद्र पि. रामचंद्र चोपडे रा. कांती कॉलनी अंबिका नगर, पालवण रोड, बीड, ता.जि. बीड हे दि. ०८/०९/२०२५ रोजी मौजे लोटस मल्टीस्टेट हॉस्पीटल, बीड** येथे मयत झाले आहेत.

अर्जदार

१) शैलजा भ्रं. रामचंद्र चोपडे, वय :- ७२ वर्ष, धंदा :- घरकाम, रा. स्नेहांकित निवास, अंबिका नगर पालवण रोड, खोलवाट बीड, ता. जि. बीड. २) त्रिशला पि. गुलाब कदम, वयः ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. सर्वे न. ६२९ नालंदा हाऊसिंग सोसायटी पलाट न. बी/४. अनित टावरचे बाजूस बिवेवाडी, पुणे ता. जि. पुणे. ह.मु. स्नेहांकीत, क्रांति कॉलनी, अंबिका नगर, पालवण रोड, बीड ता. जि. बीड.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत **नामे रविंद्र पि. रामचंद्र चोपडे रा. क्रांती कॉलनी अंबिका नगर, पालवण रोड, बीड,** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज २८/११/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख : १३/०२/२६**

**(मार्फत अँड. सुरेश एस. साळवे बीड)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरूवार, दि. ०८ जानेवारी २०२६ • पान ४

महत्वाचे...

## विनायक बप्पा मुळे यांच्याकडून डोंगरे कुटूंबाला मदतीचा हात



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी येथील भूमिपुत्र स्व. गणेश नामदेव डोंगरे (वय ३१) या तरुण ऊसतोड कामगाराचा पश्चिम महाराष्ट्रातील उमरगा येथील बिराजदार साखर कारखान्यावर काम करत असताना दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. उसाचा ट्रॅक्टर काट्यावर नंबर लावलेला असताना अचानक पुढील वाहनाने धक्का दिल्याने उसासह ट्रॅक्टर त्यांच्या अंगावर पडला. या भीषण अपघातातस्व स्व.गणेश डोंगरे यांचा जागीच दुःखद निधन झाले. या घटनेनंतर काल वडवणी तालुका शिवसेनेच्या वतीने त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्यात आली व आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख विनायक (बप्पा) मुळे, युवराज मामा शिंदे, शुभम मस्के, ह.भ.प. मुंडे महाराज, अशोक घुगे, गोरख दराडे यांच्यासह अनेक गावकरी उपस्थित होते. गणेश डोंगरे यांच्या पश्चात पत्नी व तीन लहान मुली असा परिवार आहे. कुटुंबाचा कर्ता पुरुष अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने कुटुंबावर मोठे संकट ओढावले आहे. अशा कठीण प्रसंगी शिवसेनेच्या वतीने दिलेल्या या मदतीमुळे कुटुंबाला काहीसा आधार मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## युधाजित दादा पंडित यांची तलवाडा येथे सात्वणपर भेट



**तलवाड़ा । प्रतिनिधी**

तलवाडा येथील शेख महमद निजाम (बाबु) यांचे चिरंजीव शेख इस्माइलभाई यांचे दिनांक ५/१/२०/२६ रोजी आकास्मात मृत्यु होऊन देव आज्ञा झाली होती. शेख महमद निजाम (बाबु) यांचे कुटुंब तरुण मुलाच्या आकास्मात मृत्यु व या दु:खद घटनेने गहिवरुन गेलेले होते. शेख कुटुंबीयांना धिर देण्यासाठी बीड जिल्ह्याचे माजी बांधकाम सभापती युधाजित (दादा) पंडित यांनी तलवाडा सात्वणपर भेट देऊन शेख कुटुंबीयांना धिर दिला. यावेळी खलील मामु, राजाभाऊ विटकर, शेख बादल(ठाकरे), काकुराम कांबळे, रमेश फलके, मनोज टाक, पत्रकार तुळशीराम वाघमारे, शेख रफिकभाई, बंटी भैय्या भाबरे, विनोद जगताप, भागवत नाटकर, रमेश थोरात, व पत्रकार शेख आतिखभाई सह ईतर उपस्थित होते.

## श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात माघी संकष्ट चतुर्थी गायत्री यज्ञाने साजरी



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील यशवंत नगर येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात माघी संकष्ट चतुर्थीचा पावन उत्सव गायत्री यज्ञाच्या माध्यमातून भक्तिभावपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन गायत्री परिवाराच्या वतीने करण्यात आले. मंदिराचे अध्यक्ष ॲड. मंगेश पोकळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व मोहन महाराज खरमाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात शांतता, स्थैर्य, सद्विचार व विवेकबुद्धी जागृत व्हावी, तसेच मानसिक तणाव दूर होऊन अध्यात्मिक समाधान लाभावे, या उद्देशाने गायत्री यज्ञाचे आयोजन करण्यात येते, असे यावेळी सांगण्यात आले. या यज्ञात सहभागी झाल्याने मनशांती प्राप्त होते, ईश्वरभक्ती अधिक दृढ होते व सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. या निमित्ताने मंदिर परिसर स्वच्छ, पवित्र व प्रसन्न वातावरणाने भरून गेला. गायत्री परिवाराच्या वतीने प्रत्येक संकष्ट चतुर्थी व एकादशीच्या दिवशी नियमितपणे गायत्री यज्ञाचे आयोजन करण्यात येते, अशी माहिती आयोजकांनी दिली. या धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने गायत्री परिवाराचे सक्रिय सदस्य व श्री सिद्धिविनायक गणपती मंदिराचे निस्सीम भक्त ह.भ.प. मुकुंद महाराज भुतपल्ले यांचा वाढदिवसही भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.



*रक्तदान हेच सर्वश्रेष्ठदान....बीड वडगाव गुंदा येथे जीवनदान महाकुंभ २०२६ या नरेंद्र महाराजांनी चालू केलेल्या उपक्रमाचे उद्घाटन करून नरेंद्र महाराजांचे आशीर्वाद घेताना माजी जिल्हापरिषद सदस्य गणपत आप्पा डोईफोडे, मनोज पाटील, कदम पाटील व याप्रसंगी डोईफोडे यांनी रक्तदान करून कर्तव्य बजावले याप्रसंगी पिंपळनेर सर्कल मधील अनेक सहकारी उपस्थित होते व वडगाव गुंधा येथील सर्व ग्रामस्थ मंडळी सुद्धा मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.*

### बीड चे पालकमंत्री अजित दादा उघडा डोळे बघा नीट....

# एकाच दिवसात 30 लाख वृक्षलागवडीचा इंडियन बुक ऑफ रेकॉर्डचा ढोल; प्रत्यक्षात वृक्षांची उपेक्षा!

**निदान दर्शनी भागातील रेल्वे स्टेशनवरील वाळलेल्या झाडांकडे जिल्हाधिकाऱ्यांनी 'विवेक' जागा ठेवून पाहावे : डॉ. गणेश ढवळे**

**बीड । प्रतिनिधी**

हवामान बदल, प्रदूषण आणि जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात एकाच दिवशी तब्बल ३० लाखांहून अधिक रोपांची लागवड केल्याचा गाजावाजा करण्यात आला. या उपक्रमाची इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्याचा अभिमान व्यक्त करत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.मात्र, या वृक्षलागवडीचा





खरा चेहरा वेगळाच असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे. वृक्षलागवड ही केवळ इव्हेंट म्हणून न करता, तिचे संगोपन व संवर्धन महत्त्वाचे असते. निदान बीड रेल्वे स्थानकाच्या दर्शनी भागातील लागवड केलेल्या झाडांची तरी जबाबदारी जिल्हा प्रशासनाने घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उद्घाटनाच्या झगमगाटानंतर झाडांची दुरवस्था– मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड शहरातील पालवण येथील नव्या रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या उद्घाटनापूर्वी रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य सिमेंट रस्त्याच्या कडेला १२ ते १५ फूट उंचीची झाडे लावण्यात आली होती. मात्र उद्घाटनाचा सोहळा संपताच या झाडांचे संगोपन पूर्णतः दुर्लक्षित करण्यात आले. आज त्या ठिकाणी अनेक झाडे पाण्याअभावी वाळून गेली, काही मोडून ▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबाजोगाईच्या सर्वांगीण विकासासाठी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा ॲक्शन मोडवर

**पाहिल्याच बैठकीत कर्मचाऱ्यांना दिले कडक निर्देश ; एका दिवसात मिळणार जन्म प्रमाणपत्र ; स्वच्छता, पाईपलाईनमधील गळती रोखण्याला सर्वोच्च प्राधान्य**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहराच्या विकासकामांना गती देण्यासाठी आणि नागरी समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी नवनिर्वाचित नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी नगरपालिकेतील विविध विभागांच्या कर्मचारी आणि नगरसेवकांची पहिली महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी पाणीपुरवठा, स्वच्छता,



विद्युत आणि प्रशासकीय कामकाजाचा सखोल आढावा घेत सर्व विभागांना कामकाजात सुधारणा करण्याचे स्पष्ट आदेश दिले. शहराचा कायापालट करण्यासाठी सर्व यंत्रणांनी जनसेवक म्हणून काम करावे आणि नागरिकांच्या तक्रारींना प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. शहरातील जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या पाणीपुरवठ्याबाबत बोलताना मुंदडा यांनी पाईपलाईनमधील गळती रोखण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सध्या शहरात १० ते १२ दिवसांनी होणारा पाणीपुरवठा टप्प्याटप्प्याने ▶उर्वरितपान२वर

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट क संयुक्त पूर्व परीक्षा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा–२०२५ दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकुण १२ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी एकूण २८५० उमेदवार बसलेले असून सदर परिक्षा सुरळीत पार पाडणेकरीता १२ उपकेंद्रप्रमुख, १२ मदतनीस, ४८ पर्यवेक्षक, १४६ समवेक्षक असे एकूण २१८ अधिकारी/ कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाव्दारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना दिनांक ०६.०१.२०२६ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी बीड तथा जिल्हा केंद्राप्रमुख यांनी सदर परिक्षेचे अनुषंगाने प्रशिक्षण दिले. परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परीसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे. आयोगाच्या सूचनेनुसार ▶ उर्वरित पान २ वर

## चौसाळा पत्रकार संघातर्फे एपीआय चंद्रकांत गोसावी, मुख्याध्यापिका पद्मजा हम्पे, ग्राम विस्तार अधिकारी बाबासाहेब चव्हाण यांना पुरस्कार



**चौसाळा । प्रतिनिधी**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जयंती दिवस सर्वत्र दर्पण दिन म्हणून उत्साहात साजरा केला जातो या दिवशी पत्रकारांचा सन्मान केला जातो चौसाळा पत्रकार संघाच्या वतीने याचे औचित्य साधून नेकनूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक उपनिरीक्षक चंद्रकांत गोसावी, चौसाळा जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका पद्मजा हम्पे, ग्रामविस्तार अधिकारी बाबासाहेब चव्हाण यांना चौसाळा गावचे प्रथम नागरिक बाबुशेठ लोढा यांच्या अध्यक्षतेखाली चौसाळा जिल्हा परिषद शाळेतील हॉलमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा संपन्न झाला यावेळी वरील मान्यवरांना शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह ▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा पोलीस ठाण्यामार्फत सामाजिक दायित्वेतून दर्पण दिन साजरा

**लोकशाहीत पत्रकारांची भुमीका म्हत्वाची : सपोनी निलंगेकर**

**तलवाडा । प्रतिनिधी**

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन पत्रकारांकडे पाहिले जाते. पत्रकार हे समाजात जनजागृतीचे महान कार्य करतात तर लोकशाहीत पत्रकारांची भूमिका महत्वाची असून पत्रकार बांधव हे जनसेवेचा वसा घेवून समाजातील दीनदुबळ्यांना तसेच वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करतात असे प्रतिपादन तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनी



निलंगेकर व स्वप्निल कोळी साहेब यांनी केले. तर पत्रकारितेचा खरा अर्थ केवळ बातम्या देणे नसून समाजातील वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे हा आहे. अशा उपक्रमांमुळे पत्रकारितेच्या सामाजिक भूमिकेला बळ मिळते असे मत अन्नलदास साहेब यांनी व्यक्त केले. तलवाडा पोलीस स्टेशन सर्व ▶ उर्वरित पान २ वर

## गंगाभारती महाराज पतसंस्थेच्या ठेवीदारांचा एल्गार; 9 जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

# प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ठेवीदारांमध्ये तीव्र संताप

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील गंगाभारती महाराज ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या अपहारप्रकरणी अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संतप्त ठेवीदारांनी आता आरपारच्या लढ्याचा पवित्रा घेतला आहे. येत्या ९ जानेवारी २०२६ पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष श्री. हरिओम क्षीरसागर यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

मार्च २०२३ मध्ये करचोंडी (मुख्य शाखा), लिंबागणेश, मांजरसुंबा, चौसाळा व पिंपळवाडी




या शाखांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आला होता. या पतसंस्थेत गरीब शेतकरी, कष्टकरी मजूर, विधवा महिला व वृद्ध नागरिकांनी आपल्या आयुष्याची कमाई जमा केली होती. मात्र, मुलांचे शिक्षण, लग्न व औषधोपचारासाठी ठेवलेली ही रक्कम पतसंस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व कर्मचाऱ्यांनी संगनमताने हडप केल्याचा आरोप ठेवीदारांनी केला आहे.

दोन वर्षे उलटूनही आरोपी मोकाटच– या अपहारप्रकरणी दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांविरोधात नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं. ००४५/२०२४) दाखल होऊन दोन वर्षांचा कालावधी लोटला आहे. तरीही आरोपी अद्याप फरारच आहेत. पतसंस्थेचे अध्यक्ष सुभाष विठ्ठलराव शिंदे, उपाध्यक्ष रामेश्वर सोनाजी ढेरे, व्यवस्थापक बंकट नारायण शिंदे व इतर संचालक मंडळ मोकाट फिरत असताना पोलिसांकडून अटक का होत नाही? असा संतप्त सवाल ठेवीदारांनी उपस्थित केला आहे.

प्रशासकीय यंत्रणेवर गंभीर आरोप– या प्रकरणात नियुक्त करण्यात आलेले प्रशासक पूर्णतः निष्क्रिय असून, लेखापरीक्षक अधिकारी जाणीवपूर्वक अहवाल सादर करत नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यापूर्वी ▶▶ उर्वरित पान २ वर

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागा अंतर्गत अल्पमुदतीचे रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागा अंतर्गत अल्पमुदतीचे रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम (Short Term Employability Program - STEP) पंतप्रधान यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्रात अल्पमुदतीचे रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम (Short Term Employability Program - STEP) चे उद्घाटन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाचा हा एक अभिनव उपक्रम असून हा कार्यक्रम महाराष्ट्र सरकारच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागामार्फत राबवला जात आहे. इंडस्ट्री ४.० च्या युगामध्ये आवश्यक तंत्रज्ञानाधिष्ठित कौशल्ययुक्त मनुष्यबळाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. राज्यातील इच्छुक पात्र उमेदवारांना तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) मधील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व सेवा क्षेत्रातील सुसंगत प्रशिक्षण देऊन औद्योगिक क्षेत्रास आवश्यक कुशल मनुष्यबळ पुरवणे या उद्देशाने महाराष्ट्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) व शासकीय तंत्र प्रशाला केंद्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन युगातील (New age) अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य प्रशिक्षण सुरू करण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशाला केंद्रामध्ये पायाभूत सुविधांचा महत्तम उपयोग करून संस्थेच्या वेळेव्यतिरिक्त वेळेत अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य ▶▶ उर्वरित पान २ वर